# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१८/७२२९

दिनांक :- 17 NOV 2018

प्रति,

प्राचार्य,

शासकीय/अनुदानीत व विना अनुदानीत अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र/व्यवस्थापन शास्त्र/

वास्तुशास्त्र पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

औरंगाबाद विभाग

**विषय**:- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश पडताळणीचे कामकाज संगणीकृत प्रणालीने करण्याबाबत तसेच प्रमाणपत्र/कागदपत्र अपलोड करण्याबाबत.

**संदर्भ** :-१) या कार्यालयाचे पत्र क्र. विकाऔ/शिक्षज्ञण/२०१८/३४६४, दि. २५-०९-२०१८

२) मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म. रा. मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/परिपत्रक/२०१८/१३६६ दि.३१/१०/२०१८

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशीत विद्यार्थ्यांचे प्रवेश पडताळणीचे कामकाज पूर्णपणे संगणीकृत प्रणालीने करण्याकरिता प्राधिकरणाने सर्व संस्था/महाविद्यालयांना www.safalta.org या पोर्टलवर अपलोड करण्याबाबत वरील संदर्भ क्र. १ अन्वये कळविण्यात आलेले आहे. परंतु अद्यापही काही संस्था/ महाविद्यालयांनी संस्थेची नोंदणी केल्याचे दिसून येत नाही. तसेच काही संस्थांना जे मा.उच्च न्यायालयाच्या अंतरीम आदेशानुसार प्रवेश नियामक प्राधिकारणाकडे पात्र आहेत अशांना अंतिम संधी देण्यात आली आहे.

तसेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश पडताळणीचे कामकाज संगणीकृत प्रणालीने करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. सर्व नोंदणीकृत संस्था महाविद्यालयात केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेशित उमेदवारांची प्रमाणपत्रे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत तथापि ज्या प्रवेशीत उमेदवारांची प्रमाणपत्रे कागदपत्रे सदर पोर्टलवर उपलब्ध नाहीत त्या विद्यार्थ्याबाबत संबधित महाविद्यालयांनी कागदपत्रे तात्काळ अपलोड करावीत. तसेच उपलब्ध माहितीची सत्यता सदर पोर्टलवर उपलब्ध असलेल्या मसुद्यात प्रमाणीत करुन सादर करावी. त्यानंतर याबाबत सदर पोर्टलवर संस्थांना कोणत्याही प्रकारचे बदल करता येणार नाहीत यांची नोंद घ्यावी. प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे वेळापत्रकाप्रमाणे www.safalta.org पोर्टलवर कागदपत्र अपलोड करावीत. यापुर्वीही तसे कळविण्यात आलेले आहे. (सोबत संचालनालयाचे व प्रवेश नियामक प्राधिकरणाचे परीपत्रक सोबत जोडले आहे.)

सोबतः वरीलप्रमाणे

(महेश शिवणकर)

प्र.सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रतः या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना वेबसाईवर अपलोड करण्यासाठी

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२ २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.
E-mail : desk2a@dtemaharashtra.gov.in Internet :http/www. dtemaharashtra.gov.in

महत्वाचे /तात्काळ

क्रमांक २अ/एडीएम/परिपत्रक/२०१८/ १२६८
दि. 31 OCT 2018

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे /नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

**विषय : शै.वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश पडताळणीचे कामकाज संगणीकृत प्रणालीने करण्याबाबत. तसेच प्रमाणपत्र /कागदपत्र अपलोड करण्याबाबत.**

संदर्भ: मा.सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण,मुंबई यांची दि.३१/१०/२०१८ रोजीची परिपत्रके.

महोदय

शै.वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश पडताळणीचे कामकाज पूर्णपणे संगणीकृत प्रणालीने करण्याकरीता प्राधिकरणाने सर्व संस्था /महाविद्यालयांना **www.safalata.org** या पोर्टलवर नोंदणी करण्याची विनंती केलेली होती व सदर नोंदणी प्रक्रिया दि.३०/९/२०१८ रोजी पर्यन्त सुरु ठेवण्यात आलेली होती, त्यानंतर दि.१०/१०/२०१८ ते दि.१४/१०/२०१८ याकाळात मुदतवाढही देण्यात आलेली होती परंतु अद्यापही काही संस्था /महाविद्यालयांनी संस्थेची नोंदणी केल्याचे दिसून येत नाही. तसेच काही संस्थांना जे मा.उच्च न्यायालयाच्या अंतरीम आदेशानुसार प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे पात्र आहेत अशांना अंतिम संधी देण्यात येत असून अशा संस्था /महाविद्यालयांना एक विशेष बाब म्हणून प्राधिकरणाच्या उपरोक्त नमूद पोर्टलवर नोंदणी करण्याकरीता दि.१/११/२०१८ ते दि.५/११/२०१८ या कालावधीत मुदतवाढ देण्यात येत आहे, याबाबतचे संचालनालयास प्राप्त झालेले परिपत्रक सोबत जोडण्यात येत आहे.

तसेच शै.वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश पडताळणीचे कामकाज संगणीकृत प्रणालीने करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. सर्व नोंदणीकृत संस्था महाविद्यालयात केंद्रीभूत प्रवेश प्रकियेमार्फत प्रवेशित उमेदवारांची प्रमाणपत्रे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत तथापि ज्या प्रवेशित उमेदवारांची प्रमाणपत्रे/कागदपत्रे सदर पोर्टलवर उपलब्ध नाहीत त्या विद्यार्थ्यांबाबत संबंधित महाविद्यालयांनी प्रमाणपत्रे / कागदपत्रे दि.६/११/२०१८ पर्यन्त अपलोड करावीत तसेच उपलब्ध माहितीची सत्यता सदर पोर्टलवर उपलब्ध असलेल्या मसुद्यात प्रमाणित करुन सादर करावी. त्यानंतर याबाबत सदर पोर्टलवर संस्थांना कोणत्याही प्रकारचे बदल करता येणार नाहीत याची नोंद घ्यावी अशा आशयाचे परिपत्रकसुध्दा प्राप्त झालेले आहे.

वरील दोन्ही परिपत्रके आपल्या माहिती व पुढील कार्यवाहीकरीता यासोबत जोडण्यात येत आहेत. आपणांस कळविण्यात येते की, दोन्ही परिपत्रके आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संस्था / महाविद्यालयांच्या तात्काळ निदर्शनास आणावीत.

सहसंचालक, तंत्रशिक्षण,
वि.का. औरंगाबाद
आवक क्र. 9639
दिनांक 5 NOV 2018

आपला
(डॉ.राजीव शेटकर)
उपसंचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

प्रत : मा.सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के.नायक मार्ग,फोर्ट, मुंबई - ४००००१ यांना माहितीकरीता सादर

\\192.168.1.9\Desk2a\Desk 2a- 3 (khanolkar)\Letter to R.O.297.doc

महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

दिनांक : ३१ ऑक्टोंबर, २०१८

## परिपत्रक

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश पडताळणीचे कामकाज संगणीकृत प्रणालीने करण्याबाबत...

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश पडताळणीचे कामकाज पूर्णपणे संगणीकृत प्रणालीने करण्याकरीता प्राधिकरणाने सर्व संस्था/महाविद्यालयांना www.safalta.org या पोर्टलवर नोंदणी करण्याची विनंती करण्यात आली होती. सदर नोंदणी प्रक्रिया दि.३०/०९/२०१८ पर्यंत सुरु ठेवण्यात आली होती. त्यानंतर याकरीता दि.१०/१०/२०१८ ते दि.१४/१०/२०१८ या काळात मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु अद्यापही काही संस्था/महाविद्यालयांनी आपल्या संस्थेची नोंदणी केल्याचे दिसुन येत नाहीत. तसेच काही संस्थांना जे मा.उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे पात्र आहेत अशांना अंतिम संधी देण्यात येत आहे. अशा संस्था/महाविद्यालयांना, एक विशेष बाब म्हणून, प्राधिकरणाच्या www.safalta.org या पोर्टलवर नोंदणी करण्याकरीता दि.०१/११/२०१८ ते दि.०५/११/२०१८ या कालावधीत मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी. नोंदणी करताना येणाऱ्या अडचणीतुन मार्ग काढण्याकरीता सहाय्य कक्ष सुरु करण्यात आलेले आहे. सहाय्य कक्षाचा दुरध्वनी क्र. ०२० - ६७६३५९९९ असा आहे.

(आ.ए.रायते) भा.प्र.से.
सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.

31/10

महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


दिनांक : ३१ ऑक्टोंबर, २०१८

## परिपत्रक

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश पडताळणीचे कामकाज संगणीकृत प्रणालीने करण्याबाबत.
- प्रमाणपत्र/कागदपत्र अपलोड करण्याबाबत.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश पडताळणीचे कामकाज संगणीकृत प्रणालीने करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. सर्व नोंदणीकृत संस्था महाविद्यालयात केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियामार्फत (CAP) प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. तथापि ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे/कागदपत्रे सदर पोर्टलवर उपलब्ध नाहीत, त्या विद्यार्थ्यांबाबत संबंधित महाविद्यालयांनी त्यांची कागदपत्रे दि.०६/११/२०१८ पर्यंत अपलोड करावीत तसेच उपलब्ध माहितीची सत्यता सदर पोर्टलवर उपलब्ध असलेल्या मसुदयात प्रमाणित करुन सादर करावी. त्यानंतर याबाबत सदर पोर्टलवर संस्थांना कुठल्याही प्रकारचे बदल करता येणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

(आ.ए.रायते) भा.प्र.से.
सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.

31/10